सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी कार्यालय बीड

( आस्थापना विभाग )

दुरध्वनी/फॅक्स:-02442-222458 Email-Id:-beedsdo@gmail.com

संदर्भ:-मा.जिल्हाधिकारी बीड यांचे परिपत्रक क्र.2025/आरबी-डेस्क-1/पोल-1/पोलीस पाटील/कावी दि.08.01.2026

## बीड उपविभागातील रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेबाबत जाहीरनामा

जाहिरात क्रमांक- 01/2026 दि. 19.01.2026

बीड जिल्हयातील बीड उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील ( तालुका- बीड,गेवराई व शिरुरकासार) गावात पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक अमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने https://beed.gov.in व https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहे.

अ)

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | 19 .01.2026 वेळ- सकाळी 10.00 वा पासून |
| 2 | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | 30.01.2026 वेळे 23.59 वा.पर्यंत |
| 3 | उमेदवाराचे अर्जाची छाननी करणे व पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र निर्गमीत करणे (संबंधीत उमेदवारांनी संकेतस्थळावरून प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावेत) | 02.02.2026 ते 06.02.2026 |
| 4 | लेखी परिक्षेचा दिनांक | 22.02.2026 |
| 5 | उत्तरतालीका(Answer Key) प्रसिध्द करणे | 22.02.2026 सायंकाळी |
| 6 | लेखी परिक्षेचा निकाल घोषीत करणे | 24.02.2026 |
| 7 | मुलाखतीस पात्र उमेदवाराची यादी प्रसिध्द करणे | 24.02.2026 |
| 8 | मुलाखतीचा दिनांक | 25.02.2026 ते 28.02.2026 |
| 9 | अंतिम निकाल जाहीर करणे | 02.03.2026 |

**टिप-वरील कोणत्याही दिनांकामध्ये बदल करण्याचे अधिकारी राखुन ठेवले आहेत.त्याबाबत झालेल्या बदलाबाबत संकेतस्थळावर माहिती देण्यात येईल.**

**परिक्षा शुल्क खाली प्रमाणे विहीत पध्दतीने भरावे लागेल.**

| | | |
|---|---|---|
| खुला प्रवर्ग - | रुपये 1000/- | Online payment पद्धतीने संकेतस्थळावर अर्ज भरताना त्याच वेळी भरणा करणे बंधनकारक राहील. |
| आरक्षीत/आर्थीकदुर्बल घटक प्रवर्गासाठी - | रुपये 800/- | |

(वर दर्शविण्यात आलेले प्रक्रिया शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)

UPI-Phonepay, GPay, नेटबँकिंग / डेबिट कार्ड / क्रेडीट कार्डद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास ,निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.

ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची संपूर्ण खात्री करुन घ्यावी, प्रक्रिया शुल्क भरण्या करीता नेटबँकिंग / डेबिटकार्ड / क्रेडीट कार्ड वापरून होणा-याव्यवहारांची संपुर्णत:जबाबदारी उमेदवाराची आहे व उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, बीड यारा जबाबदार असणार नाही.

सरळ सेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात https://beed.gov.in व https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. पोलीस पाटील पदाचे परीक्षेचे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त स्थळावरच ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहीत परिक्षा शुल्क असलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत : बदल करणे पदाच्या एकूण संख्येत व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार



Scanned with OKEN Scanner

उपविभागीय दंडाधिकारी बीड यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. बीड उपविभागातील पोलीस पाटलांची सदयस्थितीमधील रिक्त पदे भरणे आवश्यक आहे. त्याबाबतची रिक्त पदाची माहिती सोबत जोडलेले परिशीष्ट -अ मध्ये दशर्ववलेली आहे.

**ब)पोलीस पाटील पदासाठी किमान आवश्यक अर्हता -**

1) अर्जदार हा दहावी (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा.
2) (अ) वयोमर्यादे करीता अर्जदारचे दिनांक 30 जानेवारी,2026 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.
   (ब) अर्जदाराचे वय दिनांक 30 जानेवारी,2026 रोजी 25 पेक्षा कमी नसावे व 45 पेक्षा जास्त नसावे.
   (क) पोलीस पाटील पदाकरीता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.
3) अर्जदार हा स्थानिक व कायम रहिवासी असावा. (अर्जदाराने ग्रामपंचायत/तहसिलदार यांचे रहिवासी प्रमाणपत्र, रेशन कार्ड, निवडणूक कार्ड, ओळखपत्र, आधारकार्ड किंवा ज्या पुराव्याने स्थानिक व कायम रहिवासी असल्याचे सिध्द होते, अशा कोणत्याही एका पुराव्याची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील व मुलाखातीचे वेळी अर्जासोबत जोडलेले मूळ पुरावा कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.)
4) अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चा ई-मेल व मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे.
5) अर्जदार शाररिकदृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असणे आवश्यक आहे.
6) महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटूंबाची अर्हता धारण करणे आवश्यक (अर्जदार याची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)
7) <u>अनु. जाती व अनु. जमाती प्रवर्गाच्या व ईतर आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.</u>
8) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज ब, क, ड ,एसईबीसी या प्रवर्गातील अर्जदार यांना सन 2025-26 या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत गटात (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
9) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा अ व भज- ब, क, ड ,एसईबीसी या प्रवर्गातील महिला पदांसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदार यांना सन 2025-26 या कालावधीकरीता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
10) आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक EWS करीता आरक्षीत जागेसाठी वर्ष 2025-26 चे तहसिलदार यांनी निर्गमीत केलेले आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक EWS प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
11) सर्व आवश्यक कागदपत्र व पात्रता निकषासाठी अर्हता दिनांक ही 30 .01.2026 ही राहील.

**क)परीक्षेचे स्वरुप-**

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परीक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | तोंडी परीक्षा गुण | एकूण गुण |
| 1 | पोलीस पाटील | 80 | 20 | 100 |

<u>लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालील प्रमाणे राहील:-</u>

1) पोलीस पाटील पदाची लेखी परीक्षा 80 गुणांची असेल प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील.
2) लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
3) लेखी परीक्षा इयत्ता दहावी (एस. एस. सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल यात सामान्य ज्ञान, गणित, पोलीस पाटल्ांचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमत्ता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती चालू घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.
4) लेखी परीक्षेत एकूण 80 गुणांपैकी किमान36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारा मधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराची तोंडी परीक्षा घेण्यात येईल.
5) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2010/2009/प्र. क्र.66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तर पत्रिकेवर उत्तर लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेन वापर करावा लागेल.
6) लेखी परीक्षेत मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारास पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परीक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील तोंडी परीक्षेत अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल.

**ड)निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती :-**

1) प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस पात्रता व इतर संबंधीत मूळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी अन्यथा तोंडी परीक्षा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.
2) लेखी परिक्षा, तोंडी परीक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता तसेच प्रवेशपत्र, भरती कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील, पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
3) <u>लेखी परीक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहिरातीनुसार</u>



Scanned with OKEN Scanner

**आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. तसेच अशा अर्जदाराचे परिक्षा शुल्क इत्यादी सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.**

4) अर्जदार शारिरीकदृष्ट्या सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिका-यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.

5) अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारीत्र्य प्रमाणपत्र हे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

6) अर्जदारांचे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा.त्याचप्रमाणे तो इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी करणारा व ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा, अथवा पूर्णवेळ नोकरी करणारा नसावा याबाबतचे रुपये 500/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र हे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

7) पोलीस पाटील पदांवरील नियुक्तीकरीता मृत / सेवानिवृत्त पोलीस पाटलांच्या वारसांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी(Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यात प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्रामपोलीस पाटील (सेवा प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार त्या गावांसाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक/समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.

8) अर्जदार संबंधीत गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

9) अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असू शकतो. सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.

10) प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषानुसार आरक्षितकरण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षणव्यतिरीक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये.)

11) संपूर्ण बीड उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व गावांसाठी एकाच दिवशी व वेळी परिक्षा घेण्यात येईल.

12) संपूर्ण भरती प्रक्रिया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

13) पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.

14) पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पदधारण करणारी व्यक्ती ही शारिरिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनाअपंगासाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

15) पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते, त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांनाप्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागू होत नाहीत.

16) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती,जमाती यांचेसाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 08) हा दिनांक 29/01/2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती,जमाती,एसईबीसी प्रवर्ग यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील अर्जदारांकडे भरतीकरीता सन 2025-26 वर्षाचे वैध असलेले सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

17) महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णक क्र. महिआ२०२३/प्र.क्र.२२३/कार्या-२ दि.४मे२०२३ अन्वये खुल्या गटातील महिलां करिता आरक्षीत असलेल्या पदावरती निवडी करिता नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच,अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागासप्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागासप्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजनकल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासना कडून वेळो वेळी विहित करण्यात आल्या प्रमाणे नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

18) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारांना विहीत (अ), नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

19) लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणा-या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परीक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा अर्जदार पोलीस पाटील पदांवरील निवडीकरीता पात्र राहील.

20) समान गुण मिळाल्यास शासन निर्णय क्र. डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र.592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

1) पोलीस पाटलांचे वारस, (पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश त्याव्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही )त्यानंतर



Scanned with OKEN Scanner

2) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारणकरणारे अर्जदार, त्यानंतर
3) माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर
4) वयाने जेष्ठ असलेले अर्जदार,

21) याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय वपरिपत्रके तसेच नेमणुकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

22) हा जाहिरनामा / जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत, असे समजण्यातयेईल.

23) परीक्षा शुल्क न भरणा करण्यात आलेले अर्ज अपात्र करण्यात येतील.

## इ)ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत

1) प्रस्तुत पदांकरीता फक्त https://beedpp.recruitonline.in या अधिकृत संकेतस्थळावरून विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील.

2) इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, **बीड** हे जबाबदार असणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

3) पात्र उमेदवाराला वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://beedpp.recruitonline.in या वेबसाईटद्वारे दि. 19.01.2026 ते दि. 30 .01.2026 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.अंतीम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

4) अर्जदार यांनी सदर संकेतस्थळावर प्रथम लॉगीन आयडी व पासवर्ड तयार करुन जतन करुन ठेवावा.अर्जदार यांनी अर्ज भरताना गावाचे नाव,आरक्षण व जाहीरातीमध्यील अटी व शर्ती याची खात्री करुन अर्ज भरावा.अर्ज नाकारल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत अर्जदार यांची राहील.

5) अर्जदार यांनी सदर संकेतस्थळावर विस्तृत माहितीसाठी "प्रथम अर्ज कसा भरावा" हा टॅब ओपन करुन पहावा.

6) https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावर "अर्ज करा" या link वर clik करावे.यानंतर संबधीत पदासाठीचा अर्ज दिसुन येईल.

7) उमेदवाराने त्याचा मागील सहा महिन्याची कालावधीमधील Photo व सही संकेतस्थवर दिलेल्या माहितीनूसार upload करावा.

8) उमेदवाराने सर्व माहिती भरल्यानंतर continue वर click करावे यामुळे भरलेल्या अर्जाचे पुनर्वलोकन (Review) करता येईल.तसेच अर्जातील माहिती बदलायची असल्यास edit form वर click करुन करता येईल.

9) अर्जातील सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करुन save and continue करावे.त्यांनंतर अर्ज save होऊन Form Id तयार होईल.तयार झालेला Form Id संपुर्ण भरती प्रक्रीयेत उपयुक्त असल्याने सांभाळुन ठेवावा.

10) यानंतर उमेदवाराने परिक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने UPI-Phonepay, GPay ईत्यादवारे QR Code स्कॅन करुन **ऑनलाईन पद्धतीने** भरणे अवश्यक राहील.

11) ऑनलाईल परीक्षा शुल्क भरल्यानंतर अर्जाची print काढता येईल.

12) उमेदवाराने संकेतस्थळावर नोंदणी करताना दिलेल्या मोबाईल नंबरवर भरती प्रक्रीया संदर्भात आवश्यक त्या सुचना एसएमएसव्दारे दिल्या जातील.

13) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, अर्जदार यांचेकडे असलेली उच्च शैक्षणिक गुणवत्ता व ईतर शैक्षणीक अर्हता कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासून ऑनलाईन अर्ज भरावा.

14) अर्जदारांनी प्रवेशपत्र दि.02/02/2026 रोजीपासून Download करुन घ्यावेत.व परिक्षा दिवशी सदरील प्रवेशपत्राची कलर प्रत सादर करणे बंधनकारक राहील.प्रवेशपत्राशिवाय परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही.तसेच सोबत आधारकार्डची प्रत आणने देखील बंधनकारक राहील.तसेच महिलांचे लग्नानंतर नावात बदल झाला असल्यास **नमुना-फ** मधील स्वयंघाषनापत्र सादर करणे आवश्यक राहील.(**नमुना-फ नमुना जाहीरातीसोबत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे**)

15) कोणत्याही उमेदवारास पोस्टादवारे प्रवेशपत्र पाठवले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

16) लेखी परिक्षा झाल्यावर त्याच दिवशी प्रथम उत्तरतालीका संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल व लेखी परिक्षेच्या दुसऱ्या दिवशी सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत लेखी पुराव्यानिशी आक्षेप समक्ष उपस्थीत राहुन उपविभागीय अधिकारी कार्यालय,बीड येथे दाखल करावा.

17) उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतेही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखापरिक्षेच्या प्राथमिक चाळणी/तोंडीपरीक्षेनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी



Scanned with OKEN Scanner

केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार उपविभागीय दंडाधिकारी **बीड** यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

18) ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नोंदविलेली आहेत, अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षाशुल्क भरणे आवश्यक राहील. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, अशा उमेदवाराना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

19) माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणेआवश्यक आहे. सदरप्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करावें लागतील.

20) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचाअथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हताधारण न करणारा आढळल्यास खोटी माहिती पुरविल्यास किंवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतूनबाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्तकरण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

21) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/ नियुक्ती रद्द करण्यात येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

22) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

23) परीक्षेस पडताळणीस मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे.

24) अर्जदाराने भरती प्रक्रीये दरम्यान राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

25) यापुढील सर्व माहीती जसे,पात्र/अपात्र उमेदवारांच्या यादया,प्रवेशपत्र, उत्तरसुची (AnswerKey),उमेदवारास प्राप्त गुण यादी,मुलाखतीस पात्र उमेदवाराची यादी,अंतिम निवड यादी ई. https://beedpp.recruitonline.in **या संकेतस्थळावरील "पोलीस पाटील भरती प्रक्रीया 2026" या शिर्षकाखाली उपलब्ध राहील.**

26) सदरील भरती प्रक्रीये बाबतीत सूचना,हरकत असल्यास भ्र.धो क्र. 9689911007 यावर सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 यो वेळेत संपर्क करावा.

27) वरील अटी, शर्ती नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी पदभरतीचे अनुषंगाने निर्गमीत केलेल्या सूचना,आदेश व निर्णय लागू राहतील.

दिनांक : 19 /01/2026

ठिकाण : बीड

(कविता जाधव)
उपविभागीय दंडाधिकारी, बीड तथा,
अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती – 2026

प्रतिलीपी,

1. मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,बीड यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. उपविभागीय अधिकारी बीड/गेवराई/आष्टी यांना देऊन कळविण्यात येत की, सदर जाहीरात आपले कार्यालयाचे सुचना फलकावर दर्शनी भागावर प्रसिध्द करावी.

3.जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी,बीड यांना देऊन कळविण्यात येते की,सदर जाहीरात https://beed.gov.in या संकेतस्थळावर दि. 01.2026 रोजी प्रसिध्द करावी.

4. M-Tech multi service यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

5.तालुका दंडाधिकारी,बीड/गेवराई व शिरुरकासार यांनी सदर जाहीरात आपले कार्यालयाचे सुचना फलकावर तसेच संबंधीत गावात प्रसिध्द करुन अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

(कविता जाधव)
उपविभागीय दंडाधिकारी, बीड तथा,
अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती – 2026



Scanned with OKEN Scanner

परिशिष्ट-अ

| अ.क्र. | तालुका | गावाचे नाव | आरक्षणाचा प्रकार |
|---|---|---|---|
| 1 | BEED | शिवणी | अनु.जाती महिला |
| 2 | GEVRAI | आनंदवाडी (तलवाडा) | अनु.जाती महिला |
| 3 | BEED | जेबापिंप्री | अनु.जाती महिला |
| 4 | GEVRAI | सुलतानपुर | अनु.जाती महिला |
| 5 | GEVRAI | गौंडगांव | अनु.जाती महिला |
| 6 | GEVRAI | राक्षसभुवन | अनु.जाती महिला |
| 7 | BEED | खुंडरस | अनु.जाती महिला |
| 8 | SHIRUR | नांदेवली | अनु.जाती महिला |
| 9 | BEED | कुंभारी | अनु.जाती महिला |
| 10 | GEVRAI | डोईफोडवाडी | अनु.जाती महिला |
| 11 | GEVRAI | श्रीपत आंतरवाला | अनु.जाती महिला |
| 12 | BEED | काठोडा | अनु.जाती महिला |
| 13 | GEVRAI | सिंदफणा चिंचोली | अनु.जाती महिला |
| 14 | GEVRAI | इटकूर | अनु.जाती महिला |
| 15 | BEED | बाळापुर | अनु.जाती महिला |
| 16 | GEVRAI | गोपत पिंपळगांव | अनु.जाती महिला |
| 17 | BEED | रजाकपुर | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 18 | GEVRAI | पाथरवाला खु. | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 19 | BEED | सात्रा | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 20 | GEVRAI | केकत पांगरी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 21 | GEVRAI | खामगाव | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 22 | BEED | मौज | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 23 | BEED | पिंपळगांव मोची | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 24 | BEED | पारगाव जप्ती | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 25 | BEED | उमरी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 26 | BEED | घाटजवळा | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 27 | BEED | नागापूर बु. | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 28 | GEVRAI | रांजणी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 29 | BEED | बेलापुरी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |
| 30 | GEVRAI | खेर्डीवाडी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण |

| अ.क्र. | तालुका | गावाचे नाव | आरक्षणाचा प्रकार |
|---|---|---|---|
| 218 | GEVRAI | सिरसमार्ग | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 219 | GEVRAI | भडंगवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 220 | SHIRUR | गोमळवाडा | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 221 | GEVRAI | सावळेश्वर | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 222 | BEED | कर्झनी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 223 | GEVRAI | कोपरा | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 224 | GEVRAI | निपाणी जवळका | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 225 | GEVRAI | जोडवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 226 | GEVRAI | अनकुटा | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 227 | BEED | मौजवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 228 | BEED | खडकीघाट | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 229 | SHIRUR | आर्वी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 230 | SHIRUR | बोरगाव च. | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 231 | BEED | चिंचोलीमाळी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 232 | GEVRAI | कोल्हेर | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 233 | BEED | पोखरी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 234 | BEED | मानेवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 235 | SHIRUR | टाकळवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 236 | GEVRAI | नांदलगाव | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 237 | GEVRAI | दिग्रस | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 238 | BEED | आडगाव | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 239 | SHIRUR | निमगाव मा. | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 240 | BEED | ताडसोन्ना | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 241 | BEED | भवानवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 242 | BEED | वरवटी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 243 | BEED | मांडवखेल | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 244 | BEED | कानडीघाट | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 245 | BEED | अंधापुरी | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 246 | BEED | गुंधावाडी | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 247 | SHIRUR | येवलवाडी | एसईबीसी प्रवर्ग- महिला |



Scanned with OKEN Scanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 31 | SHIRUR | भडकेल | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 248 | SHIRUR | आनंदवाडी (शिरापूर धु. सज्जा) | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 32 | BEED | बहिरवाडी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 249 | SHIRUR | झापेवाडी | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 33 | GEVRAI | बोरगावथडी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 250 | BEED | चौदसवाडी | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 34 | SHIRUR | सावरगाव च. | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 251 | BEED | बाबळखुंटा | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 35 | GEVRAI | ढालेगाव | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 252 | BEED | भंडारवाडी | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 36 | BEED | दहिफळ | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 253 | BEED | चाकरवाडी | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 37 | GEVRAI | गोळेगांव | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 254 | BEED | वैतागवाडी | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 38 | BEED | ब्रम्हगाव | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 255 | BEED | आनंदवाडी (कळसंबर स. ) | एसईबीसी प्रवर्ग- महिला |
| 39 | GEVRAI | गोंदी खु. | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 256 | SHIRUR | रूपेवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 40 | GEVRAI | कुंभे जळगांव | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 257 | BEED | जाधववाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 41 | BEED | मुर्शदपुर | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 258 | BEED | पांढ-याचीवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 42 | GEVRAI | तपे निमगाव | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 259 | SHIRUR | चाहूरवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 43 | GEVRAI | टाकळगव्हाण तरफ तालखेड | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 260 | SHIRUR | नारायणवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 44 | GEVRAI | भाटेपुरी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 261 | BEED | सावंतवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 45 | BEED | आंबीलवडगांव | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 262 | BEED | सुर्याचीवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 46 | BEED | खांडेपारगांव | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 263 | BEED | जैताळवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 47 | GEVRAI | संगमजवळा | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 264 | BEED | बेलगांव | एसईबीसी सर्वसाधारण |
| 48 | SHIRUR | बावी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 265 | SHIRUR | मोरजळवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 49 | BEED | सोमनाथवाडी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 266 | BEED | मसेवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 50 | GEVRAI | उक्कडपींपरी | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 267 | SHIRUR | खामकरवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 51 | GEVRAI | जातेगाव | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 268 | BEED | गोगलवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 52 | BEED | येळंबघाट | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 269 | BEED | रत्नागिरी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 53 | GEVRAI | पांगूळगाव | अनुसूचीत जाती सर्वसाधारण | 270 | SHIRUR | उखळवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 54 | BEED | पेंडगाव | अनु.जमाती महिला | 271 | SHIRUR | बरगवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 55 | GEVRAI | रसुलाबाद | अनु.जमाती महिला | 272 | BEED | धावज्याचीवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 56 | GEVRAI | मानकापूर | अनु.जमाती महिला | 273 | BEED | खर्डेवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 57 | BEED | देवीबाभुळगांव | अनु.जमाती महिला | 274 | SHIRUR | जेधेवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 58 | GEVRAI | एरंडगाव | अनु.जमाती महिला | 275 | BEED | कळसंबर | एसईबीसी सर्वसाधारण |
| 59 | GEVRAI | वडगाव ढोक | अनु.जमाती महिला | 276 | BEED | जरुड | एसईबीसी सर्वसाधारण |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 60 | BEED | शिदोड | अनु.जमाती महिला |
| 61 | BEED | बोरखेड | अनु.जमाती महिला |
| 62 | GEVRAI | धारवंटा | अनु.जमाती महिला |
| 63 | GEVRAI | कोळगांव | अनु.जमाती महिला |
| 64 | GEVRAI | पाथरवाला बु. | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 65 | BEED | चांदेगांव | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 66 | SHIRUR | वडाळी | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 67 | GEVRAI | राजापूर | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 68 | BEED | वासनवाडी | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 69 | SHIRUR | ढोकवड | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 70 | GEVRAI | गुंतेगाव | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 71 | SHIRUR | पौंडूळ | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 72 | BEED | खंडाळा | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 73 | GEVRAI | मिरकळा | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 74 | GEVRAI | दिमाखवाडी | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 75 | SHIRUR | वरंगळवाडी | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 76 | SHIRUR | मातोरी | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 77 | GEVRAI | बोरगाव बु. | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 78 | GEVRAI | अर्धमसला | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 79 | GEVRAI | रुई | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 80 | SHIRUR | शिरापूर गा. | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 81 | BEED | समनापुर | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 82 | SHIRUR | माळेवाडी | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 83 | BEED | औरंगपुर | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 84 | GEVRAI | रेवकी | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 85 | GEVRAI | म्हाळसपिंपळगाव | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 86 | SHIRUR | बहिरवाडी | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |
| 87 | BEED | जिरेवाडी | अनुसूचीत जमाती सर्वसाधारण |

| | | | |
|---|---|---|---|
| 277 | BEED | मुगगाव | एसईबीसी सर्वसाधारण |
| 278 | BEED | मुळुकवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 279 | BEED | केतुरा | एसईबीसी सर्वसाधारण |
| 280 | BEED | देव-याचीवाडी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 281 | BEED | लोणीघाट | एसईबीसी सर्वसाधारण |
| 282 | GEVRAI | बोरी पिंपळगाव | एसईबीसी सर्वसाधारण |
| 283 | BEED | ईट | एसईबीसी सर्वसाधारण |
| 284 | SHIRUR | शिरापूर धु. | एसईबीसी सर्वसाधारण |
| 285 | BEED | भाट्सांगवी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 286 | GEVRAI | गढी | एसईबीसी सर्वसाधारण |
| 287 | SHIRUR | खरमाटवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 288 | SHIRUR | खांबा | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 289 | SHIRUR | खालापूरी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 290 | BEED | किन्हीपाई | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 291 | GEVRAI | कोलतेवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 292 | BEED | उमरद खालसा | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 293 | BEED | बोरदेवी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 294 | GEVRAI | बेलगुडवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 295 | GEVRAI | भाट अंतरवली | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 296 | BEED | मन्यारवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 297 | SHIRUR | ढिसलेवाडी/दत्त नगर | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 298 | GEVRAI | खेर्डा बु. | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 299 | BEED | मांजरसुंबा | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 300 | BEED | हिवरापहाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 301 | BEED | वडगाव गुंधा | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक महिला |
| 302 | GEVRAI | लोळदगाव | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 303 | GEVRAI | बाबुलतारा | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 304 | BEED | सौंदाना | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 88 | BEED | ढेकनमोहा तांडा | विमुक्त जाती - अ महिला |
| 89 | GEVRAI | गोखर तांडा | विमुक्त जाती - अ महिला |
| 90 | BEED | रामनगर तांडा | विमुक्त जाती - अ महिला |
| 91 | GEVRAI | पोईतांडा | विमुक्त जाती - अ महिला |
| 92 | GEVRAI | दामुनाईकतांडा | विमुक्त जाती सर्वसाधारण |
| 93 | GEVRAI | गोळेगाव तांडा | विमुक्त जाती सर्वसाधारण |
| 94 | GEVRAI | रामनगर तांडा | विमुक्त जाती सर्वसाधारण |
| 95 | GEVRAI | काठोडा तांडा | विमुक्त जाती सर्वसाधारण |
| 96 | GEVRAI | हरिलाल नाईकतांडा | विमुक्त जाती सर्वसाधारण |
| 97 | BEED | लक्ष्मी आई तांडा | विमुक्त जाती सर्वसाधारण |
| 98 | BEED | अंथरवनपिंप्री (तांडा) | विमुक्त जाती सर्वसाधारण |
| 99 | SHIRUR | लमाणवाडी नं. 2 | विमुक्त जाती सर्वसाधारण |
| 100 | GEVRAI | रोकडा | विमुक्त जाती सर्वसाधारण |
| 101 | GEVRAI | लोणाळा | विमुक्त जाती सर्वसाधारण |
| 102 | BEED | माळेवाडी | भटक्या जमाती - ब. महिला |
| 103 | GEVRAI | चिखली | भटक्या जमाती - ब. महिला |
| 104 | GEVRAI | राहेरी | भटक्या जमाती - ब. महिला |
| 105 | GEVRAI | माळहिवरा | भटक्या जमाती - ब. महिला |
| 106 | SHIRUR | हिंगेवाडी | भटक्या जमाती –ब सर्वसाधारण |
| 107 | BEED | घोसापुरी | भटक्या जमाती –ब सर्वसाधारण |
| 108 | GEVRAI | बेलगाव | भटक्या जमाती –ब सर्वसाधारण |
| 109 | BEED | नामलगाव | भटक्या जमाती –ब सर्वसाधारण |
| 110 | BEED | कुर्ला | भटक्या जमाती –ब सर्वसाधारण |
| 111 | BEED | घारगांव | भटक्या जमाती –ब सर्वसाधारण |

| | | | |
|---|---|---|---|
| 305 | BEED | तांदळयाचीवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 306 | BEED | कामखेडा | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 307 | BEED | लोळदगांव | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 308 | GEVRAI | माटेगांव | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 309 | BEED | सुर्डीथोट | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 310 | GEVRAI | गोविंदवाडी (चव्हाणवाडी सज्जा ) | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 311 | GEVRAI | हिवरवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 312 | SHIRUR | नागरेवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 313 | BEED | रुईगव्हाण | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 314 | BEED | हिंगणी हवेली | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 315 | SHIRUR | घोगस पारगाव | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 316 | GEVRAI | खडकी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 317 | BEED | कारळवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 318 | BEED | नवाबपुर | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 319 | SHIRUR | वारणी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 320 | BEED | बेलवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 321 | GEVRAI | आम्ला | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 322 | SHIRUR | लोणी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 323 | SHIRUR | तागडगाव | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 324 | GEVRAI | मुळुकवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 325 | BEED | कोळवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 326 | SHIRUR | उकीर्डा च. | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 327 | GEVRAI | खांडवी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 328 | BEED | बेडकुचीवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 112 | BEED | चांदणी | भटक्या जमाती –ब सर्वसाधारण |
| 113 | BEED | शहाजानपुर लिंबा | भटक्या जमाती –ब सर्वसाधारण |
| 114 | BEED | पिंपळगावघाट | भटक्या जमाती –ब सर्वसाधारण |
| 115 | SHIRUR | मांगेवाडी | भटक्या जमाती- क महिला |
| 116 | GEVRAI | बागपिंपळगाव | भटक्या जमाती- क महिला |
| 117 | SHIRUR | धनगरवाडी | भटक्या जमाती- क महिला |
| 118 | GEVRAI | गाडेवाडी | भटक्या जमाती- क महिला |
| 119 | SHIRUR | उंबरमुळी | भटक्या जमाती- क महिला |
| 120 | GEVRAI | चोरपुरी | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 121 | SHIRUR | शिंगारवाडी | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 122 | SHIRUR | शेरेवाडी | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 123 | GEVRAI | शिंदेवाडी | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 124 | GEVRAI | चोपड्याचिवाडी | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 125 | BEED | धनगरवाडी | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 126 | BEED | बहादरपुर | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 127 | GEVRAI | पिंपळगांव कानडा | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 128 | GEVRAI | देवकी | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 129 | SHIRUR | भान्नकवाडी खा. वा. | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 130 | GEVRAI | तरटेवाडी | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 131 | BEED | आनंदवाडी (शिदोड स.) | भटक्या जमाती - क सर्वसाधारण |
| 132 | SHIRUR | बडेवाडी | भटक्या जमाती -ड महिला |
| 133 | SHIRUR | घुगेवाडी | भटक्या जमाती -ड महिला |
| 134 | BEED | निवडुंगवाडी | भटक्या जमाती -ड महिला |
| 135 | SHIRUR | डोळेवाडी | भटक्या जमाती -ड सर्वसाधारण |
| 136 | BEED | कचारवाडी | भटक्या जमाती -ड सर्वसाधारण |
| 137 | SHIRUR | वंजारवाडी | भटक्या जमाती -ड सर्वसाधारण |

| | | | |
|---|---|---|---|
| 329 | GEVRAI | पांडूळयाचीवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 330 | BEED | रामगांव | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 331 | GEVRAI | हिरापुर | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 332 | GEVRAI | महांडुळा | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 333 | GEVRAI | शेकटा | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 334 | GEVRAI | गोविंदवाडी | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 335 | GEVRAI | ताकडगाव | आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक सर्वसाधारण |
| 336 | BEED | अंबेसावळी | सर्वसाधारण महिला |
| 337 | BEED | काटवटवाडी | सर्वसाधारण महिला |
| 338 | BEED | घाटसावळी | सर्वसाधारण महिला |
| 339 | BEED | अंथरवनपिंप्री | सर्वसाधारण महिला |
| 340 | SHIRUR | मार्कडवाडी | सर्वसाधारण महिला |
| 341 | BEED | कारेगव्हाण | सर्वसाधारण महिला |
| 342 | SHIRUR | मलकाचीवाडी | सर्वसाधारण महिला |
| 343 | SHIRUR | पिंपळयाचीवाडी | सर्वसाधारण महिला |
| 344 | SHIRUR | ब्र.येळंब | सर्वसाधारण महिला |
| 345 | GEVRAI | टाकळगाव | सर्वसाधारण महिला |
| 346 | GEVRAI | राजपिंप्री | सर्वसाधारण महिला |
| 347 | BEED | बोरफडी | सर्वसाधारण महिला |
| 348 | GEVRAI | तळनेवाडी | सर्वसाधारण महिला |
| 349 | BEED | राजुरी घोडका | सर्वसाधारण महिला |
| 350 | GEVRAI | वडगाव सुशी | सर्वसाधारण महिला |
| 351 | SHIRUR | पाडळी | सर्वसाधारण महिला |
| 352 | GEVRAI | खळेगाव | सर्वसाधारण महिला |
| 353 | GEVRAI | पौळाचीवाडी | सर्वसाधारण महिला |
| 354 | GEVRAI | जवाहरवाडी | सर्वसाधारण महिला |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 138 | BEED | सानपवाडी | भटक्या जमाती -ड सर्वसाधारण |
| 139 | SHIRUR | सांगळवाडी | भटक्या जमाती -ड सर्वसाधारण |
| 140 | BEED | डोईफोडवाडी | भटक्या जमाती -ड सर्वसाधारण |
| 141 | BEED | मानकुरवाडी | विशेष मागास प्रवर्ग - महिला |
| 142 | GEVRAI | भेंडटाकळी | विशेष मागास प्रवर्ग - महिला |
| 143 | BEED | ढेकनमोहा | विशेष मागास प्रवर्ग - महिला |
| 144 | BEED | आहेर धानोरा | विशेष मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 145 | GEVRAI | तळेवाडी | विशेष मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 146 | GEVRAI | रानमळा | विशेष मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 147 | BEED | काळेगाव हवेली | विशेष मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 148 | GEVRAI | सेलू | विशेष मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 149 | BEED | लिंबागणेश | विशेष मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 150 | BEED | राजुरी न. | विशेष मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 151 | GEVRAI | शिंपेगांव | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 152 | BEED | पाली | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 153 | BEED | उदंडवडगाव | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 154 | BEED | मेंगडेवाडी | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 155 | GEVRAI | पाडळसिंगी | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 156 | BEED | वाढवना | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 157 | BEED | नाथापुर | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 158 | GEVRAI | दैठण | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 159 | SHIRUR | हिवरसींगा | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 160 | BEED | कांबी | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 161 | GEVRAI | कटचिंचोली | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 162 | SHIRUR | गाजीपूर | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 163 | BEED | पाटोदा बे. | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 164 | BEED | पालसिंघन | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 165 | BEED | कुक्कडगाव | इतर मागास प्रवर्ग - महिला |

| | | | |
|---|---|---|---|
| 355 | GEVRAI | सावरगाव पो. | सर्वसाधारण महिला |
| 356 | GEVRAI | अंतरवली | सर्वसाधारण महिला |
| 357 | BEED | पिंपळादेवी | सर्वसाधारण महिला |
| 358 | GEVRAI | मालेगाव बु. | सर्वसाधारण महिला |
| 359 | SHIRUR | दहिवंडी | सर्वसाधारण महिला |
| 360 | BEED | खामगाव | सर्वसाधारण महिला |
| 361 | SHIRUR | खोपटी | सर्वसाधारण महिला |
| 362 | SHIRUR | जाटवड | सर्वसाधारण महिला |
| 363 | GEVRAI | सिरसदेवी | सर्वसाधारण महिला |
| 364 | BEED | कोल्हारवाडी | सर्वसाधारण महिला |
| 365 | SHIRUR | बारगजवाडी | सर्वसाधारण महिला |
| 366 | BEED | सफेपुर | सर्वसाधारण (खुला) |
| 367 | SHIRUR | रुपूर | सर्वसाधारण (खुला) |
| 368 | SHIRUR | मदमापुरी | सर्वसाधारण (खुला) |
| 369 | BEED | वडगाव क | सर्वसाधारण (खुला) |
| 370 | BEED | म्हाळसजवळा | सर्वसाधारण (खुला) |
| 371 | BEED | वाकनाथपुर | सर्वसाधारण (खुला) |
| 372 | GEVRAI | भोजगांव | सर्वसाधारण (खुला) |
| 373 | BEED | सोनपेठवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 374 | GEVRAI | कोमलवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 375 | GEVRAI | सुरळेगांव | सर्वसाधारण (खुला) |
| 376 | GEVRAI | गुंळज | सर्वसाधारण (खुला) |
| 377 | GEVRAI | कवडगाव | सर्वसाधारण (खुला) |
| 378 | BEED | धोत्रा | सर्वसाधारण (खुला) |
| 379 | SHIRUR | खोल्याचीवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 380 | GEVRAI | देवपिंपरी | सर्वसाधारण (खुला) |
| 381 | BEED | म्हाळसापुर तांडा | सर्वसाधारण (खुला) |
| 382 | GEVRAI | लुखामसला | सर्वसाधारण (खुला) |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 166 | BEED | ब-हाणपुर | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 167 | BEED | गवारी | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 168 | BEED | पिंपळगाव मंजरा | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 169 | BEED | लोणी शहाजहानपुर | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 170 | BEED | वानगाव | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 171 | SHIRUR | विघनवाडी | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 172 | SHIRUR | कान्होबाचीवाडी | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 173 | GEVRAI | बंगाली पिंप्री | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 174 | BEED | महाजनवाडी | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 175 | GEVRAI | पंचाळेश्वर | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 176 | BEED | भाळवणी | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 177 | BEED | तिप्पटवाडी | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 178 | BEED | इमामपुर | इतर मागास प्रवर्ग - महिला |
| 179 | GEVRAI | कांबी मजरा | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 180 | BEED | काकडहिरा | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 181 | GEVRAI | औरंगपुर कुकडा | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 182 | BEED | मांडवजाळी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 183 | GEVRAI | पोखरी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 184 | BEED | मंझरी. हवेली | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 185 | GEVRAI | बऱ्हाणपुर | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 186 | GEVRAI | साठेवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 187 | GEVRAI | किनगाव | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 188 | BEED | नागापुर खु. | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 189 | BEED | कुटेवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 190 | SHIRUR | हाजीपूर | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 191 | BEED | च-हाटा | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 192 | BEED | सांडरवन | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 193 | GEVRAI | वाहेगाव आम्ला | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 194 | GEVRAI | सैदापुर | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 195 | GEVRAI | गायकवाड जवळा | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण |
| 383 | GEVRAI | काळवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 384 | SHIRUR | फुलसांगवी | सर्वसाधारण (खुला) |
| 385 | BEED | रौळसगांव | सर्वसाधारण (खुला) |
| 386 | BEED | अंजनवती | सर्वसाधारण (खुला) |
| 387 | GEVRAI | धोंडराई | सर्वसाधारण (खुला) |
| 388 | GEVRAI | ब्रम्हगांव | सर्वसाधारण (खुला) |
| 389 | GEVRAI | अर्धपिंपरी | सर्वसाधारण (खुला) |
| 390 | GEVRAI | भेंड(खुर्द) | सर्वसाधारण (खुला) |
| 391 | BEED | माळापुरी | सर्वसाधारण (खुला) |
| 392 | GEVRAI | टकलेवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 393 | GEVRAI | महारटाकळी | सर्वसाधारण (खुला) |
| 394 | GEVRAI | धुमेगाव | सर्वसाधारण (खुला) |
| 395 | SHIRUR | घाटशिळ पा. | सर्वसाधारण (खुला) |
| 396 | BEED | कदमवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 397 | GEVRAI | शिराळा | सर्वसाधारण (खुला) |
| 398 | GEVRAI | मालेगाव मजरा | सर्वसाधारण (खुला) |
| 399 | BEED | तांदळवाडी भिल्ल | सर्वसाधारण (खुला) |
| 400 | BEED | वंजारवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 401 | BEED | पारगांव सिरस | सर्वसाधारण (खुला) |
| 402 | GEVRAI | आगर नांदूर | सर्वसाधारण (खुला) |
| 403 | GEVRAI | मारफळा | सर्वसाधारण (खुला) |
| 404 | GEVRAI | रामपूरी | सर्वसाधारण (खुला) |
| 405 | GEVRAI | मनुबाई जवळा | सर्वसाधारण (खुला) |
| 406 | GEVRAI | भोगलगांव | सर्वसाधारण (खुला) |
| 407 | SHIRUR | पांगरी | सर्वसाधारण (खुला) |
| 408 | BEED | खापरपांगरी | सर्वसाधारण (खुला) |
| 409 | SHIRUR | जांब | सर्वसाधारण (खुला) |
| 410 | GEVRAI | मुधापूरी | सर्वसाधारण (खुला) |
| 411 | GEVRAI | जळगांव मजरा | सर्वसाधारण (खुला) |
| 412 | BEED | सावरगांव घाट | सर्वसाधारण (खुला) |



Scanned with OKEN Scanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 196 | BEED | लिंबारुई देवी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 413 | BEED | पोथरा | सर्वसाधारण (खुला) |
| 197 | BEED | गोलंग्री | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 414 | GEVRAI | काजळेचीवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 198 | BEED | बकरवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 415 | SHIRUR | खोकरमोहा | सर्वसाधारण (खुला) |
| 199 | GEVRAI | मानमोडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 416 | SHIRUR | पिंपळनेर | सर्वसाधारण (खुला) |
| 200 | BEED | साक्षाळपिंप्री | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 417 | BEED | पालवन | सर्वसाधारण (खुला) |
| 201 | SHIRUR | राक्षसभुवन तांबा | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 418 | BEED | उमरद जहांगीर | सर्वसाधारण (खुला) |
| 202 | GEVRAI | काजळा | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 419 | BEED | पिंपरनई | सर्वसाधारण (खुला) |
| 203 | BEED | हिंगणी बु | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 420 | GEVRAI | वंजारवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 204 | SHIRUR | जाटनांदूर | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 421 | GEVRAI | कुंभारवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 205 | BEED | लिंबारुई | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 422 | SHIRUR | माळेगाव च. | सर्वसाधारण (खुला) |
| 206 | BEED | नाळवंडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 423 | SHIRUR | राळेसांगवी | सर्वसाधारण (खुला) |
| 207 | BEED | सोनगांव (सि.) | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 424 | SHIRUR | तरडगव्हाण आ. | सर्वसाधारण (खुला) |
| 208 | BEED | राक्षसभुवन | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 425 | BEED | गुंजाळा | सर्वसाधारण (खुला) |
| 209 | SHIRUR | कोळवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 426 | BEED | हिंगणी खु | सर्वसाधारण (खुला) |
| 210 | BEED | शहाजनपूर (कामखेडा) | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 427 | SHIRUR | श्रीपतवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 211 | BEED | चव्हाणवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 428 | SHIRUR | टेंभूर्णी | सर्वसाधारण (खुला) |
| 212 | GEVRAI | रामेश्वर | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 429 | SHIRUR | हाटकरवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 213 | GEVRAI | पांढरवाडी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 430 | BEED | गवळवाडी | सर्वसाधारण (खुला) |
| 214 | BEED | रंजेगांव | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 431 | BEED | वलीपुर | सर्वसाधारण (खुला) |
| 215 | BEED | वांगी | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 432 | GEVRAI | खोपटी | सर्वसाधारण (खुला) |
| 216 | BEED | मोरगांव | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 433 | GEVRAI | मालेगाव खु. | सर्वसाधारण (खुला) |
| 217 | BEED | अव्वलपुर | इतर मागास प्रवर्ग - सर्वसाधारण | 434 | BEED | मुर्शदपुर घाट | सर्वसाधारण (खुला) |

टिप-1. दि.26.12.2025 रोजी आरक्षण सोडत केलेल्या गावापैकी गेवराई तालुक्यात गंगावाडी नावाचे दोन गावे असून (मौ.गंगावाडी राहेरी )या गावाचा समावेश होता परंतु (मौ.गंगावाडी राहेरी )या गावचे पोलीस पाटील यांची अंतीम मुदत संपलेली नाही व ते कार्यरत असल्याने त्याचा समावेश जाहीरातीमध्ये करण्यात आलेला नाही.

2. दि.26.12.2025 रोजी आरक्षण सोडत केलेल्या गावापैकी मौ.तिंतरवणी ता.शिरुरकासार येथे पोलीस चौकी (दुरक्षेत्र) मंजुर झालेले असून नजीकच्या काळात पोलीस चौकी सुर करण्यात येणार असल्याचे उ.वि.पोलीस अधिकारी गेवराई यांनी दि.15.01.26 च्या पत्रानूसार कळवले असल्याने मौ.तिंतरवणी गावाचा समावेश जाहीरातीमध्ये करण्यात आलेला नाही.

(कविता जाधव)
उपविभागीय दंडाधिकारी, बीड तथा,
अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती – 2026



Scanned with OKEN Scanner

## नमुना-फ

## स्वयंघोषणापत्र

मी,श्रीमती (लग्नानंतरचे नाव)------------------------------------------------------------ राहणार(गावाचे नाव)--------------------------ता.------------------------जि .बीड येथील रहिवासी आहे.याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

1. मी पोलीस पाटील पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
2. माझे लग्नापूर्वीचे नाव श्रीमती-----------------------------------------------------असे आहे व लग्नानंतरचे नाव श्रीमती-----------------------------------------------------असे आहे.
3. पोलीस पाटील पदाच्या फॉर्मचा आयडी क्रमांक-----------------------------------------
4. आधार क्रमांक---------------------------------------------------------------------

वरील दोन्ही नावाची व्यक्ती मीच असून यात काही तफावत आढळल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार मी राहील व यामुळे पोलीस पाटील पदासाठी मी अपात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण-

दिनांक-

संपूर्ण नाव------------------------------------------------------ सही-

**सुचना-**

1. सर्व विवाहीत महिलांनी पोलीस पाटील पदासाठी लग्नापुर्वी/लग्नानंतरचे नावाने केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील.
2. उमेदवाराने लेखी परिक्षाच्या वेळेस रंगीत प्रवेशपत्र (Color Copy) व आधारकार्ड सोबत सदरचे स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

Scanned with OKEN Scanner